# भारतातील पवित्र बौद्ध स्थळे जागतिक पर्यटनाचे आदर्श

**प्रा. डी. जी. कापुरे** राजा शिवछत्रपती कला व वाणिज्य महाविद्यालय, महागाव ता. गडहिंग्लज जि. कोल्हापूर
ई-मेल- digambarkapure@gmail.com मोबाइल न.-९६२३६४१९५८

---

**प्रस्तावना:-**

पर्यटनाचे आणेक प्रकार आहेत परंतु त्या पैकी ऐतिहासिक व धार्मिक पर्यटन हे दोन प्रकार प्राचीन काळा पासून ते आजतागायत जगप्रसिध्द आहेत, धार्मिक व ऐतिहासिक पर्यटना बाबत भारत हा उपखंड बौद्ध धर्माच्या पर्यटना साठी जगप्रसिध्द आहेत दरवर्षी बौध्द राष्ट्रातील लाखों पर्यटक भारतदेशात येऊन पवित्र बौध्द स्थळांना भेटी देऊन जातात. मानवता, समता, बंधुता, शांती, प्रज्ञा, करुणा, दया, क्षमा, व विज्ञानवाद यांची शिकवण देणारा महान बौध्द धर्म ह्या भारत देशात हजारो वर्ष अस्तित्वात होता. तथागत भगवान बुद्धाच्या पवित्र पावन चरणांनी स्पर्श झालेल्या भारत देशात आणेक महान पवित्र बौध्द स्थळे जागतिक पर्यटना पटलावर महान व पवित्र आणि आदर्श पर्यटन स्थळे म्हणून प्रसिध्द आहेत. प्रस्तुत शोध निबंध "भारतातील बौद्ध स्थळे जागतिक पर्यटनाचे आदर्श" ह्या शोध निबंधात भारतातील पवित्र व महान बौध्द पर्यटनस्थळा आढावा घेतलेला आहे, सारनाथ, बौद्धगया, कुशीनारा, सांची, राजगिरी, नालंदा, वैशाली, अमरावती, श्रावस्ती, अजिंठा वेरूळ, दीक्षाभूमी नागपूर, ह्या भारतातील पवित्र बौध्द पर्यटन स्थळा बरोबर नेपाळ येथील लुंबिनी ह्या पवित्र बौध्द स्थळाचा आढावा घेतलेला आहे ह्यामुळे शोध निबंधला अधिक परिपूर्ण स्वरूपात मांडता येईल, प्रस्तुत शोध निबंध "भारतातील बौद्ध स्थळे जागतिक पर्यटनाचे आदर्श" हा शोध निबंध लिहीत असताना प्रमुख ऐतिहासिक व धार्मिक बौध्दस्थळांचा आढावा घेतला आहे. पर्यटनाच्या दृष्टीने बौद्ध धार्मिक स्थळे अत्यंत महत्वाचे व अनन्यसाधारण समृद्ध व प्रसिध्द असे आहेत. जागतिक पर्यटन वारसास्थळात बौध्द पर्यटन स्थळे आदर्श असे दिसून येतात. प्रस्तुत शोध निबंध "भारतातील बौद्ध स्थळे जागतिक पर्यटनाचे आदर्श" ह्या शोध निबंधाचा सविस्तर आढावा संशोधन पद्धती, हेतु, उद्देश,गृहतिके, सारांश पुढील प्रमाणे विशद करता येईल.

**शोध निबंधाचे उदिष्टये/ हेतु:-**

प्रस्तुत शोध निबंधाचे उदिष्ट्ये पुढील प्रमाणे सांगता येतील

1. बौद्ध कालीन सांस्कृतिक ऐतिहासिक धार्मिक पर्यटनस्थळांचा आढावा घेणे.
2. भारतातील महान बौद्ध धर्मीय प्रमुख बौद्ध स्थळा विषयी माहिती संकलित करणे.
3. जागतिक पर्यटन स्थळाचे आदर्श पवित्र बौद्ध धार्मिक ऐतिहासिक पर्यटन स्थळा विषयी माहिती देणे.
4. प्राचीन काळ ते आजतागायत ऐतिहासिक धार्मिक पर्यटन स्थळामध्ये बौद्ध कालीन धार्मिक स्थळे महान असे पर्यटन स्थळे दिसून येतात ते स्पष्ट होते.

**शोध निबंधांचे गृहतिके:-**

प्रस्तुत शोध निबंधाचे गृहतिके पुढील प्रमाणे सांगता येतील.

1. पर्यटनाचा जागतिक वारसा म्हणून भारतातील पवित्र बौद्ध स्थळांविषयक वस्तुनिष्ठ माहिती देणे.
2. जागतिक पर्यटनाचे केंद्र भारतातील पवित्र बौद्ध स्थळे धार्मिक सांस्कृतिक व ऐतिहासिक पर्यटन स्थळे आदर्श पर्यटन स्थळे म्हणून समता शांती बंधुत्वाचे केंद्र म्हणून विशद करणे.

**संशोधन पद्धती:-**

प्रस्तुत शोध निबंध "भारतातील बौद्ध स्थळे जागतिक पर्यटनाचे आदर्श" ह्या शोध निबंधाचे लिखाण करत असताना बौद्ध कालीन पर्यटन स्थळांचा आढावा घेतलेला आहे. ह्या बरोबर प्राथमिक साधने म्हणून पर्यटन स्थळाची पाहणी परीक्षण करून तथा विविध प्रवास वर्णनने संदर्भ ग्रंथ, वर्तमानपत्रे, स्तंभलेख, संगणक संकेतस्थळे आदिचा अभ्यास करून संशोधन शोध निबंध लिहिला आहे. प्रामुख्याने भारतातील पर्यटनस्थळा बरोबर लुंबूनी ह्या नेपाळातील एका बौद्ध स्थळांची माहिती संकलित केली आहे. सदर शोध निबंध लिहीत असताना वस्तुनिष्ठ, ऐतिहासिक, वर्णनात्मक, विश्लेषणात्मक् संशोधन पद्धतीचा अवलंब केलेला आहे. भारतीय पर्यटनात बौद्ध धार्मिक तथा ऐतिहासिक स्थळे जागतिक पर्यटनाचे आदर्श स्थळे आहेत असे स्पष्ट दिसून येते म्हणून भारतातील बौद्ध स्थळे जागतिक पर्यटनाचे आदर्श असे सांगता येतील. महत्वपूर्ण व ठळक ऐतिहासिक, धार्मिक पवित्र बौद्ध स्थळे व त्यांचा आढावा व सारांश पुढील प्रमाणे घेता येईल.

**लुंबिनी:-**

लुंबिनी नेपाळ येथील तथागत भगवान बुद्धाचे जन्म स्थळ आहे. ते बौद्ध धर्मातील चार पवित्र स्थळा एक आहे. तथागत भगवान बुद्धाच्या जन्मभूमी मुळे जागतिक बौद्ध धर्मियांचे ते आदरयुक्त असे श्रद्धास्थान आहे ऐतिहासिक व धार्मिक दृष्टिकोनातून

पवित्र असलेल्या ह्या ठिकाणी तथागत भगवान बुद्धाच्या मातेचे मायदेवी विहार आहे, व एक सुंदर असा तलाव आहे. सम्राट अशोक ह्या महान सम्राटाने बुद्धाचे जन्मस्थळ असल्यामुळे येथे एक स्तंभ उभारलेला आहे. येथे चीन, जापान म्यानमार, श्रीलंका, या देशानी आपआपल्या स्थापत्य शैलीत बुद्ध मठांची अर्थात विहारांची स्थापना केलेली आहे. जगात शांतता कायम नांदावी म्हणून येथे निरंतर जळणार दीप कायम प्रज्ज्वलीत आहे, त्याला शांतीदीप असे म्हणतात दरवर्षी येथे लक्षावधी पर्यटक धार्मिक तथा ऐतिहासिक पर्यटना येतात म्हणून जागतिक पर्यटन स्थळा पैकी लुंबिनी हे तीर्थस्थळ एक महान व जागतिकस्तरा वरील एक आदर्श बौद्ध धर्म पर्यटन स्थळ असून जागतिक वारसा स्थळांच्या यादीत अग्रस्थानी आहे म्हणून सांगता येईल.

**सारनाथ:-**

उत्तर प्रदेशातील वाराणशी जिल्ह्यात सारनाथ हे एक पवित्र बौद्ध धार्मिक स्थळ आहे येथे तथागत भगवान बुद्ध यांनी ज्ञानप्राप्ती नंतर आपले पहिले प्रवचन दिले होते ह्या महान घटनेला "धम्म चक्र परिवर्तन" म्हणून ओळखले जाते बौद्ध धर्मातील चार पवित्र धार्मिक स्थळा पैकी सारनाथ हे एक आहे. येथे तथागत बुद्ध यांनी दिलेल्या प्रथम उपदेशांच्या जागी धम्मस्तूप बांधलेला आहे ह्या बरोबरच चौखंडी स्तूप, सारनाथ पुरातत्विय संग्रहालय, मूलगंध कुटी आधुनिक विहार तिब्बेट व थायलंड यांनी बांधलेले विहार व सम्राट अशोक यांचा जगप्रसिद्ध अशोकस्तंभ जो वर्तमान भारताचे राष्ट्रीय चिन्ह आहे. हे सर्व सारनाथ येथे आहे जागतिक स्तरावर भारतात असलेल हे बौद्ध कालीन प्राचीन धार्मिक तथा ऐतिहासिक पर्यटन स्थळ जागतिक पर्यटन स्थळा पैकी एक पवित्र व महान आदर्श पर्यटन स्थळ म्हणून सांगता येईल सारनाथ ह्या तथागत भगवान बुद्धाच्या पदस्पर्शाने पवित्र झालेल्या ठिकाणाला दरवर्षी लक्षावधी अनुयायी तथा पर्यटक भेट देऊन जातात.

**बोधगया:-**

बिहार राज्यात बोधगया हे बौद्ध धर्मातील चार महत्वपूर्ण पवित्र स्थळा पैकी एक महत्वपूर्ण प्राचीन ऐतिहासिक धार्मिक बौद्ध धर्माचे पवित्र स्थान आहे. येथे तथागत भगवान बुद्ध यांना ज्ञान प्राप्ती झाली व मानवतावादी बौद्ध धर्माची स्थापना झाली ह्या धर्माला धम्म असे म्हणतात. बोधगया येथे महाबोधि विहार आहे. तथागत भगवान बुद्धाच्या ज्ञानप्राप्तीचे ते प्रतीक आहे. तथागत भगवान बुद्धाला ज्ञानप्राप्ती झाली तो विशाल बोधिवृक्ष येथे आहे. बुद्धाच्या आणेक मूर्ती येथे आहेत. एक ध्यानस्थ पद्मासन अवस्थेत पंचवीस मीटर उंच मूर्ती आहे. लहानमोठे आणेक प्राचीन स्तूप चैत्य विहारे येथे आहेत. जगातील बौद्ध राष्ट्रांनी आपआपल्या संस्कृती व स्थापत्या नुसार बौद्ध विहारे बांधलेली आहेत् जगातील पवित्र पर्यटन स्थळांपैकी बोधगया हे एक ऐतिहासिक, सांस्कृतिक, धार्मिक दृष्ट्या जगातील आदर्श पर्यटन स्थल आहे, येथे वर्षभर मानवतावादी समतावादी लोकसमूहाचे येणे जाणे सुरू असते म्हणून जगातील अग्रस्थानी असलेल हे एक पवित्र व आदरयुक्त स्थळ आहे.

**कुशीनारा/ कुशीनगर:-**

प्राचीन काळातील कुशीनारा अर्थात आताचे कुशीनगर हे एक अत्यंत पवित्र असे बौद्ध धर्मातील चार पवित्र स्थळा पैकी एक आहे. उत्तर प्रदेशातील कुशीनगर हा एक जिल्हा आहे येथे तथागत भगवान बुद्धाचे महापरिनिर्वाण झाले होते येथे येथे महापरिनिर्वाण स्तूप असून त्या मध्ये तथागत भगवान बुदधाची सवासहा मीटर लांब महापरिनिर्वाण अवस्थेतील मूर्ती आहे येथे तथागत भगवान बुद्धाचे अंतिम संस्कार झाले होते, येथे आणेक बौद्ध राष्ट्रांनी आपआपल्या नागरिकांच्या सोईसाठी बौद्ध विहारे बांधलेली आहेत् जगातील सर्वात पवित्र प्राचीन असे शांतिप्रधान असलेल हे ठिकाण पर्यटनासाठी जागतिक स्तरावर एक आदर्श पवित्र व महान पर्यटन स्थळ आहे वर्षभर येथे मोठ्या श्रद्धेने लाखों लोक उपासक ह्या पवित्र महान आदर्श ऐतिहासिक धार्मिक पर्यटन स्थळास भेट देतात म्हणून हे एक पर्यटन स्थळ जागतिक वारसा स्थळात प्रमुख पर्यटन स्थळा पैकी एक आहे.

**सांची:-**

सर्वकालीन महान सम्राट अशोक यांनी सांची तथागत भगवान बुद्धाच्या अवशेषावर सांची हे महान स्तूप निर्माण केले. सम्राट अशोकाने मध्यप्रदेशत बौद्ध धर्माचा प्रचार करत असताना सांची स्तूपाची निर्मिती केली तथागत भगवान अवशेषामुळे हे ठिकाण बौद्ध धर्मात पवित्र असे आहे. सांची हे एक महान स्तूप आहे प्राचीन ऐतिहासिक व धार्मिक स्थळ म्हणून हे प्रसिद्ध आहे. सांची परिसरात आणेक लहान मोठे स्तूप आहेत सांची स्तूपाची स्थापत्य कला अत्यंत सुंदर व उत्तम वास्तु विशारदतेचा नमूना आहे, आज हे स्थळ जागतिक वारसा स्थळांच्या यादीत समाविष्ट झालेले आहे. ऐतिहासिक व धार्मिक पर्यटनाच्या दृष्टीने हे ठिकाण अत्यंत महत्वाचे आहे. "भारतातील बौद्ध स्थळे जागतिक पर्यटनाचे आदर्श पाहत असताना सांची हे बौद्ध धार्मिक स्थळ अत्यंत महत्वाचे आहे येथे दरवर्षी लाखों पर्यटक येऊन जातात म्हणून मध्यप्रदेशतील रायसेन जिल्ह्यातील हे एक महान व पवित्र पर्यटन स्थळ आहे म्हणून जागतिकस्तरावर सांची एक आदर्श पर्यटन स्थळ आहे असे स्पष्ट होते.

**राजगीर व नालंदा:-** राजगीर ह्या ठिकाणचे प्राचीन नाव राजगृह असे होते ते बिहार मधील नालंदा ह्या सध्या स्थित जिल्ह्यातील महत्वपूर्ण बौद्ध स्थळ आहे. प्राचीन काळात ते मगध राज्याची राजधानी होती येथे तथागत भगवान बुद्धाचे वास्तव्य

आणेक वर्ष होते त्याचे प्रतीक म्हणून येथे आणेक स्तूप चैत्य आहेत येथे वेळूवन आहे. येथील विश्वशांती स्तूप जगात शांतता कायम राहावे म्हणून हे स्तूप भगवान बुद्धाच्या विचारांचे प्रतीक आहे येथे आणेक पर्यटन स्थळ दिसून येतात दरवर्षी लाखों पर्यटक भेटी देतात. तर नालंदा हे एक बौद्ध धर्मातील महत्वपूर्ण ठिकाण येथे तथागत भगवान बुद्धाच्या काळात बौद्ध धम्म ज्ञान केंद्र निर्माण झाले होते पुढे नालंदा हे पहिले विश्वविद्यापीठ झाले सुरवाती पासून बौद्ध विद्यापीठ असलेल्या ह्या विद्यापीठात प्राचीन काळापासून देश-विदेशातील विद्यार्थी ज्ञानअर्जनांसाठी येथे येत असत सम्राट हर्षवर्धनाच्या काळात हे विद्यापीठ भरभराटीस आले बाराव्या शतकात यवन आक्रमकानी हे विद्यापीठ नष्ट केले परंतु आजतागायत हे ज्ञान केंद्र जगाला मार्गदर्शन करत आहे. म्हणून नालंदा हे जगातील पाहिले विद्यापीठ पाहण्यासाठी दरवर्षी हजारो पर्यटक येऊन जातात म्हणून राजगीर व नालंदा हे भारतातील महान बौद्ध पर्यटन स्थळ जगातील आदर्श पर्यटन स्थळ ठरतात असे दिसून येते.

**श्रावस्ती व वैशाली: -**

श्रावस्ती हे उत्तर प्रदेशातील महान बौद्ध धर्मस्थळ आहे. श्रावस्ती हे शहर प्राचीन कालीन कौशल राज्याची राजधानी होती बौद्ध काळात प्रसंनजीत नावाचा राजा राज्य करत होता. श्रावस्ती येथे भगवान बुद्धाचे तब्बल चोवीस वर्ष वास्तव्य होते येथे जेतवन व भगवान बुद्धाचे गंधकुटी हे राहण्याचे ठिकाण पान तेथे आहे जेतवन विहार व गंधकुटी, अंगुलीमाल स्तूप अनाथपिंडक स्तूप पाहण्या सारखे आहेत बुद्धाच्या वास्तव्याने पावन व पवित्र असलेल्या ह्या भूमीला दरवर्षी लाखों पर्यटक धार्मिक ऐतिहासिक पर्यटनस्थळ म्हणून भेट देतात भारतातील हे महान पर्यटनस्थळ जगात आदरयुक्त असे आहे.

वैशाली हे एक बिहार राज्यातील महत्वपूर्ण बौद्ध धर्मीय पर्यटन स्थळ आहे, येथे भगवान बुद्ध यांनी आणेक प्रवचन दिले. येथे जगातील पहिले गणराज्य राज्य होते येथे आणेक स्तूप विहारे, चैत्य, आढळून येतात येथे भगवान बुद्धाच्या अस्थिवर बांधलेले प्राचीन स्तूप दिसून येते ह्या बरोबरच अशोकस्तंभ येथे आहे बौद्ध धर्मातील एक पवित्र व महान पर्यटन स्थळ आहे येथे दरवर्षी लाखों पर्यटक येतात. जगाला शांततेचा संदेश देणारे श्रावस्ती व वैशाली हे धार्मिक ऐतिहासिक पर्यटन स्थळे जगात आदर्श पर्यटन स्थळे म्हणून ओळखले जातात.

**अमरावती:-**

आंध्र प्रदेशातील एक महत्वपूर्ण बौद्ध धर्मीय ठिकाण अमरावती हे आंध्र प्रदेशातील गुंटूर जिल्ह्यात एक महत्वपूर्ण बौद्ध धर्मियांचे पवित्र ठिकाण येथे महान सम्राट अशोक यांनी अमरावती स्तूप ही महान वास्तु निर्माण केली पुढे सातवाहन राजाने ह्या स्तूपला भव्यदिव्य असा आकार दिला अमरावती स्तूपावर भगवान बुद्ध यांच्या जीवनावर आधारित जातक कथा कोरलेल्या दिसून येतात जागतिक पातळीवर अमरावती हे एक महान ऐतिहासिक तथा धार्मिक बौद्ध धर्मीय स्थळ आहे. तेथे सातवाहन कालीन आणेक बुद्ध शिल्प आढळून येतात हे एक महान भारतातील जागतिकस्तरा पर्यटन स्थळ दिसून येते

**अजिंठा व वेरूळ:-**

महाराष्ट्रातील संभाजी नगर जिल्ह्यात अजिंठा वेरूळ हे प्रसिद्ध पर्यटन स्थळ आहेत. येथे जगप्रसिद्ध बौद्ध लेण्या आढळून येतात. अजिंठा येथे एकोणतीस तर वेरूळ येथे चोवतीस लेण्या आढळून येतात अजिंठा येथे भगवान बुद्धाच्या जीवनावर आधारित चित्रकला आजतागायत दिसून येते ह्या चित्रातील रंगसंगती अत्यंत उत्तम प्रकारे दिसून येते. जागतिक वारसा स्थळा पैकी अजिंठा व वेरूळ हे महत्वपूर्ण पर्यटन स्थळे आहेत अजिंठा येथे विहार स्तूप व चैत्य दिसून येतात त्याच प्रकारे वेरूळ येथे ही दिसून येते येथे भगवान बुद्धाच्या भव्यदिव्य मूर्ती दिसून येतात जागतिक पर्यटन स्थळा पैकी अजिंठा व वेरूळ एखाद्या आश्चर्या सारखे भासतात येथे दरवर्षी देश विदेशातील हजारो पर्यटक या पर्यटन स्थाळना भेट देतात भारतातील जागतिक स्तरावरील अजिंठा व वेरूळ हे महान व पवित्र बौद्ध धार्मिक ऐतिहासिक पर्यटन स्थळे म्हणून संगत येतील.

**नागपूर दीक्षाभूमी:-**

नागपूर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी बौद्ध धर्माचे पुनर्जीवन दिले, त्यांनी १४ ऑक्टोबर १९५६ साली बौद्ध धर्माची दीक्षा घेतली नाग लोकांची भूमी नागपूर असल्यामुळे व ते नाग लोक प्राचीन काळापासून बौद्ध धर्मीय असल्यामुळे नागपूर या ठिकाणी बौद्ध धर्माचे पुनरजीवन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केले. येथे सांचीच्या स्तूपा पासून प्रेरणा घेऊन दीक्षाभूमी नागपूर येथील भव्यदिव्य स्तूप निर्माण केलेला दीक्षा भूमी परिसरात बोधगया येथून आणलेल्या बोधिवृक्षा पासून ह्या वृक्षाची निर्मिती झालेली आहे डॉ. बाबाबसहेब आंबेडकर यांची व तथागत भगवान बुद्धाच्या प्रतिमा आहेत. सामाजिक न्यायाचे ठिकाण म्हणून नागपुर येथील दीक्षाभूमी ओळखली जाते. दर वर्षी १४ ऑक्टोम्बर रोजी देश विदेशातील लाखों बौद्ध धर्मीय अनुयायी येथे येतात जागतिकस्तरावर धार्मिक ऐतिहासिक पर्यटन म्हणून नागपुर अर्थात दीक्षाभूमी हे जागतिकस्तरावर प्रसिद्ध आहे. व देश विदेशातील पर्यटकाचे आदर्श स्थान आहे. असे संगत येईल.

**सारांश/ उपसंहार:-**

"भारतातील बौद्ध स्थळे जागतिक पर्यटनाचे आदर्श" ह्या शोध निबंधाचा सविस्तर आढावा घेत असताना नेपाळातील लुंबिनी हे भगवान बुद्धाचे जन्मस्थान व भारतातील बोधगया, सारनाथ . सांची, राजगिरी, नालंदा, वैशाली, अमरावती, श्रावस्ती, अजिंठा वेरूळ, दीक्षाभूमी नागपूर, ह्या भारतातील पवित्र बौध्द पर्यटन स्थळाचा आढावा घेतलेला आहे, जागतिकस्तरावर भारतातील बौद्ध पर्यटन स्थळे आदर्श आहेत. धार्मिक ऐतिहासिक प्राचीन, असलेले हे स्थळे आजही मानवतेचे प्रतीके म्हणून जागतिकस्तरावर प्रसिद्ध आहेत नेपाळातील लुंबिनी येथे तथागत भगवान बुद्धाचा जन्मस्थळ आहे तर बोधगया येथे तथागत भगवान बुद्धाला ज्ञानप्राप्त झाले, तर सारनाथ येथे तथागत भगवान बुद्ध यांनी प्रथम प्रवचन दिले त्या घटनेला धम्म परिवर्तन चक्र दिन असे म्हणतात. कुशीनारा अर्थात कुशीनगर येथे भगवान बुद्धाचे महापरिनिर्वाण झाले म्हणून लुंबिनी, बोधगया, सारनाथ, कुशीनारा, हे बौद्ध धर्मातील चार अत्यंत पवित्र ठिकाणे मानले जातात म्हणून जागतिकस्तरावर धार्मिक व ऐतिहासिक पर्यटन स्थळे म्हणून आदर्श असे दिसून येतात या बरोबरच राजगिरी, नालंदा, वैशाली, अमरावती, श्रावस्ती, अजिंठा वेरूळ, दीक्षाभूमी नागपूर आदि बौध्द धर्मातील पवित्र महान ऐतिहासिक स्थळांची माहिती प्रस्तुत शोध निबंधात दिलेली आहे. एकंदरीत भारतातील बौद्ध स्थळे जागतिक पर्यटनाचे आदर्श ठरतात प्रस्तुत शोध निबंधात मोजक्याच बौद्ध धर्मातील पवित्र महान प्राचीन ऐतिहासिक व धार्मिक पर्यटन स्थळा विषयक माहिती घेतलेली आहे परंतु प्राचीन काळापासून बौद्ध धर्म भारतीय उपखंडाचा मुख्य धर्म होता म्हणून सर्व भारतीय उपखंडात बौद्ध धर्माच्या पाऊलखुणा काश्मीर ते कन्याकुमारी आणि आसाम ते गुजरात पर्यन्त बौद्ध धर्माचे अवशेष आढळून येतात भारतात प्राचीन काळापासून ते आजातगायत कोट्यावधी पर्यटक बौद्ध धर्माच्या अभ्यासासाठी तथागत भगवान बुद्धाच्या पदस्पर्शाने पावन पवित्र झालेल्या स्थाळाना भेटी देण्यासाठी लाखों पर्यटक येतात भारतातील बौद्ध स्थळे जागतिक पर्यटनाचे आदर्श ठरतात असे दिसून येते असे सांगता येईल.

**संदर्भ ग्रंथ:-**

1. जोय बोस सीवा प्रसाद बोस- भारतीय उपमहाद्वीप में बौद्धस्थल-जोय बोस प्रकाशन- दिल्ली
2. प्रियसेन सिंह – भारत के प्रमुख बुद्ध तीर्थ स्थल- ईस्टर्न बूक लिंकर्स प्रकाशन- दिल्ली १९९३
3. वासुदेव उपाध्याय- प्राचीन भारतीय स्तूप गुहा और मंदिर- प्रकाशक बिहारी हिन्दी ग्रंथ अकादमी दिल्ली १९७२
4. डॉ. ए. के. चतूरवेदी- प्राचीन भारतीय इतिहास- एसबिपिडी प्रकाशन दिल्ली
5. Sunita Dwivedi-BUDDHIST HERITAGE SITES OF INDIA –Rupa Publication
6. डॉ. सूरज ए पंडित -महाराष्ट्रातील बौद्ध लेणी-आप्रांत प्रकाशन
7. ओम प्रकाश पांडे- सारनाथ की कला –भारती प्रकाशन २०००
8. देबाल मित्रा-सांची भारतीय पुरातत्व सर्वेक्षण -१९६८
9. त्रिपिटकाचार्य भिक्षू धर्मरचीत- कुशीनगर का इतिहास- सिद्धार्थ ग्रंथ प्रकाशन